ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख १८ मे, १९५२ | अंक २१

## विविध माहिती

**रशिआ सीलोनचें खोबरें घेणार**—रशियानें सीलोनकडून खोबरेल तेल विकत घेण्याची खटपट चालविली आहे. रशियांत झारचें राज्य असतांनासुद्धां सीलोन रशियाला बरेंच खोबरेल विकत असे. रशियाच्या मागणीमुळें खोबरेल तेलाच्या पडलेल्या किंमती सुधारण्याचा संभव आहे.

**अमेरिकेंत कागदाचा नवा कारखाना**—ब्रिटनची बोवाटर पेपर कॉर्पोरेशन ही कंपनी अमेरिकेंत ५·५ कोटी पौंड भांडवलाची एक कागदाची गिरणी काढणार आहे. ब्रिटिश मालकीची अमेरिकेंत निघणारी ही पहिलीच कंपनी आहे. गिरणींत दरवर्षी १,३०,००० टन वृत्तपत्रांना लागणारा कागद आणि ५०,००० टन पल्प तयार होईल.

**एलिझाबेथ राणीचा राज्याभिषेक**—इंग्लंडची राणी दुसरी एलिझाबेथ हिच्या राज्यारोहणाची तारीख पुढील २ जून १९५३ ही ठरविण्यांत आली आहे. समारंभासाठी सुमारें १०,००,०० पौंड खर्च येईल असा अंदाज आहे. लंडनमधील होटेल्सच्या मालकांकडे जागा राखून ठेवण्यासाठी आतांपासूनच पत्रांचे ढीग येत आहेत.

**अरविंद बाबूंचें अप्रकाशित साहित्य**—अरविंद-विद्यापीठ फंडाच्या एका सदस्यानें अरविंद घोष ह्यांच्या अप्रकाशित साहित्याचीं हस्तलिखितें हस्तगत केलीं आहेत. ह्या संग्रहालयांत अरविंद बाबूंनीं मृणालिनी देवींना लिहिलेलीं पत्रें व त्यांचे कांहीं फोटोहि आहेत.

**म्हैसूर संस्थानांतील रस्ते**—सेंट्रल पेट्रोल फंडापैकीं सुमारें २३ लाख रुपयांची रकम म्हैसूर संस्थानांतील रस्ते दुरुस्त करण्यासाठीं मंजूर करण्यांत आली आहे. सदर रकमेपैकीं १४ लाख रुपये रकम १५ मैल लांबीचे रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे करण्यासाठीं चालू वर्षी खर्च करण्यांत येणार आहे.

**विमान उतरण्यासाठीं नैसर्गिक तळ**—मध्य प्रदेशांतील बस्तार जिल्ह्यांत अभुजमठ डोंगरांत विमानें उतरण्यास नैसर्गिक सोयीची अशी एक जागा सांपडली आहे. ह्या ठिकाणीं एक अखंड सपाट खडक असून त्याची लांबी ५ मैल आणि रुंदी २ फर्लांग आहे. ही जागा जगदालपूरपासून ६५ मैल अंतरावर आहे.

**गृहकृत्यांच्या शिक्षणाचें कॉलेज**— प. पंजाबमधील लाहोर या शहरांत मुलींना गृहकृत्यांचें शिक्षण देण्यासाठीं एक कॉलेज उघडण्यांत येणार आहे. कॉलेजच्या स्थापनेसाठीं ३ लाख रुपये खर्च येणार असून त्यांत २०० मुलींना प्रवेश देण्यांत येईल. गृहकृत्यांचें शिक्षण कसें द्यावें, तें शिकण्यासाठीं बऱ्याच शिक्षकांना परदेशीं पाठविण्यांत येणार आहे.

**शारीरिक शिक्षणाचें कॉलेज**—मद्रास राज्यांत विजयवाडा येथें शारीरिक शिक्षण देण्याचें दुसरें कॉलेज येत्या जुलै महिन्यापासून सुरू करण्यांत येणार आहे. संस्थेसाठीं प. गोदावरी जिल्हा बोर्डानें १०,००० रुपये मंजूर केले आहेत. शाळांतून व्यायाम-शिक्षकांची जी उणीव भासते, ती नाहींशी करण्याच्या हेतूनें हें कॉलेज काढण्यांत येत आहे.

**रशिआची सीलोनला मदत**— सीलोनमधील रबराच्या झाडावर कीड पडली आहे. ती नाहींशी करण्यासाठीं त्यांच्यावर गंधकाचा फवारा उडविणें जरूर आहे. रशिआनें सीलोनला हें गंधक पुरविण्याची तयारी दाखविली आहे.

**पेन्सिली तयार करण्याचा धंदा**— डेहराडून येथील जंगलखात्यानें पेन्सिली तयार करण्यासाठीं घरीं वापरतां येतील अशा प्रकारचीं साधीं हत्यारें तयार केलीं आहेत. ह्या हत्यारांचा उपयोग करून कुशल कामगारास रोज २१ पेन्सिली तयार करतां येतील.

**टेलिव्हिजनाचा परिणाम**— ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशननें टेलिव्हिजनच्या परिणामासंबंधीं पहाणी केली असतां असें आढळून आलें कीं, ज्यांच्याजवळ टेलिव्हिजन सेट्स आहेत त्यांच्यापैकीं ६३ टक्के लोक पूर्वीपेक्षां कमी वेळां सिनेमाला जातात. ४२ टक्के लोक पूर्वीपेक्षां कमी वेळ वाचनांत घालवूं लागले असल्यानें पुस्तकांचा खप कमी झाला आहे. १४ ते २४ पर्यंतच्या वयाचीं मुलें करमणुकीसाठीं बाहेर जाण्यापेक्षां घरींच टेलिव्हिजनचा कार्यक्रम पाहूं इच्छितात.

**अब्राहम लिंकनच्या कागदपत्रांचा लिलांव**— अमेरिकेच्या यादवी युद्धासंबंधीच्या व अब्राहम लिंकनच्या कांहीं जुन्या कागदपत्रांचा न्यूयार्क येथें नुकताच लिलांव करण्यांत आला असता, त्यांची सुमारें २॥ लाख डॉलर्स किंमत आली. लिंकनच्या १८ खाजगी पत्रांचेच ३५,००० डॉलर्स मिळाले.

**भारतीय रेशीम आणि पाकिस्तान**—मुंबईच्या सिल्क मर्चंटस असोसिएशनचे अध्यक्ष श्री. एल. पी. शहा ह्यांनीं अशी सूचना केली आहे कीं, पाकिस्तानला भारतामधील कृत्रिम रेशमाची गरज असल्यानें सरकारनें उभय देशांत व्यापार करण्याची सोय करावी.

**बंगलोरजवळील कारखाना**—बंगलोर जवळील जलहली येथील मशीन टूल्सचा कारखाना उभारण्यासाठीं मध्यवर्ती सरकारला ८ कोटी रुपये लागले. पुढील वर्षाच्या प्रारंभीं कारखान्यांत उत्पादन होऊं लागेल. प्रथम लेथ्स व नंतर इतर हत्यारें तयार करण्यांत येतील.

## टेलिफोनसाठी पुण्यांतील मागणी व दिलेलीं कनेक्शन्स

टेलिफोन अधिकाऱ्यांकडे आज सुमारें ८००–८५० अर्ज पडून आहेत व नित्यशः त्यांत नव्या मागणी–अर्जांची भर पडत आहे.

पुण्याचा नवा ऑटोमॅटिक एक्स्चेंज १७५० लाइन्सचा आहे. यांपैकीं नेहमींच्या रिवाजाप्रमाणें ५ टक्के लाइन्स मोडतोड, बदली व आयत्या वेळच्या निकडींच्या गरजा भागविण्यासाठी राखीव ठेवण्याची पद्धत असल्यानें त्या १७५० लाइन्सपैकीं ५ टक्के सोडून १६६० लाइन्स कायमच्या जोडण्याची शक्यता उरते; या १६६० मधून १६१५ लाइन्सवर आज टेलिफोन्स जोडलेले आहेत. आतां फार तर ४०–५० कनेक्शनें देणें शक्य आहे. गेल्या कांहीं वर्षांत खालीलप्रमाणें कनेक्शनें देण्यांत आलीं आहेत:—

ऑटोमॅटिक एक्स्चेंज, १७५० लाइन्सचा

| सन | एक्स्चेंजवर (Direct) | Extensions (फांटे) | Private Branch Exchange मधून एक्स्चेंजवर P. B. X. |
|---|---|---|---|
| १९४९ | ७८१ | ११७ | ९४७ |
| १९५० | ११७५ | ११७ | ८४० |
| १९५१ | १५२० | १२९ | ८७६ |
| १९५२ (एप्रिलपर्यंत) | १६१५ | २०३ | १०६९ |

वरील आकड्यांवरून हें स्पष्ट होईल कीं गेल्या २॥–३ वर्षांच्या काळांत सुमारें ८००–८५० नवीं कनेक्शनें देऊन लोकांची गरज भागविली आहे. १९४९ मध्यें असलेल्या कनेक्शनांच्या दुपटीवर कनेक्शनें आज चालू आहेत. आतां फक्त ४०–५० नवीं कनेक्शनें देतां येतील.

वाढती मागणी लक्षांत घेऊन स्थानिक अधिकाऱ्यांनीं पुण्यास आणखी ५०० लाइन्सचा एक नवा एक्स्चेंज मागविला आहे. त्यास मान्यता मिळाली असून तो येऊन उभा राहण्यास कांहीं अवधि लागेल. सुमारें वर्षभरांत तें काम होईल, असा त्याबद्दलचा खात्याचा आजचा अंदाज आहे; परंतु तोंपर्यंत मागणी आणखी वाढेल व जनतेची गैरसोय कायम राहील. ही स्थिति लक्षांत आणून शिवाजीनगर पोस्टापाशीं आणखी एक नवा एक्स्चेंज, सुरवातीस १,००० लाइन्सचा व जो पुढें २०० लाइन्स इतका वाढवितां येईल असा बसवावा अशी मागणी भारत सरकारच्या योग्य त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केलेली असून खात्याच्या चीफ इंजिनिअरची त्यास मान्यता मिळाली आहे. परंतु, हा नवा एक्स्चेंज प्रत्यक्षांत बसण्याची शक्याशक्यता आर्थिक व इतर परिस्थितीवर अर्थात् अवलंबून आहे. दिल्ली, मुंबई, कानपूर, अहमदाबाद, कलकत्ता वगैरे ठिकाणीं ज्याप्रमाणें मागणी करणारांकडून अगाऊ रु. २,००० ते २,५०० घेऊन सरकारनें त्या त्या ठिकाणासाठी लागणारा पैसा गोळा केला, तसा तो पुण्यासहि गोळा करतां आला तर वरील काम सत्वर होईल, नाहींपेक्षां त्यास विलंब व कालावधि लागेल.

—श्री. द्वा. वा. पोतदार, 'संपदा' मे १९५२


स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०–६–५१ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,६५,००० |
| ठेवी | रु. | ६७,९९,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७९,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–११–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

एस. एच. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

दि युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला, ( चेअरमन )

ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन

रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन

अनंत चरण लॉ — महादेव एल. डहाणूकर

बैजनाथ जालन — मदनमोहन आर. रुइया

गोविंदलाल बंगूर — मोहनलाल एल. शहा

पी. डी. हिमतसिंगका — मोतीलाल तापुरिया

रामेश्वरलाल नोपानी — नवीनचंद्र मफतलाल

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सींच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १८ मे, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चीनमधील ब्रिटिश कंपन्या धंदा बंद करणार

चीनमधील ब्रिटिश कंपन्यांनीं त्यांचा तेथील व्यवहार गुंडाळून टाकण्याचें ठरविलें आहे, कारण त्यांना तो चालू ठेवणें अशक्य झालें आहे. चीनमध्यें पूर्वी जे व्यवहार खासगी व्यापारी व कारखानदार स्वतः करीत असत, ते आतां चिनी सरकारनें आपणाकडे घेतले आहेत. ब्रिटिश नोकरांच्या चीनमध्यें ये-जा वरील बंधनें अधिकाधिक जाचक होऊं लागलीं आहेत. चिनी सरकारच्या कराच्या मागण्या वाढल्या आहेत आणि ज्या कामगारांना यावयास काम नाहीं, अशांनाहि नोकरीवर ठेवण्याची व वेतन देण्याची ब्रिटिश कंपन्यांवर सक्ति होऊं लागली आहे. ह्या कारणांमुळें, बऱ्याच कंपन्या कांहीं काळ तोट्यांतच चालल्या आहेत. तेव्हां, चीनमध्यें समाधानकारक व्यवहार करणें त्यांना अशक्य वाटून त्यांनीं आपल्या मालमत्तेची व हितसंबंधांची व्यवस्था लावून देण्यास प्रारंभ केला आहे. हाँगकाँगमधील ब्रिटिश कंपन्यांवर ही आपत्ति अद्याप आलेली नाहीं. चीनमधील ब्रिटिश मालकीच्या जंगम मालमत्तेची किंमत ५० कोटी पौंडांपर्यंत होईल, असा अंदाज आहे.

बंद होणाऱ्या कंपन्यांनीं एक स्वतंत्र संघटना करून, तिच्या मार्फत चिनी सरकारशीं व्यापारी व्यवहार करावे, असें सुचविण्यांत आलें आहे. परंतु, चीनशीं व्यापार चालू ठेवणें कठीण झालें आहे; चीन शक्यतों रशिया व पूर्वयुरोप ह्यांतूनच आयात करण्याचें धोरण ठेवील, हें उघड आहे. आबादान येथें ब्रिटिश तेल-कंपनीला घ्यावी लागलेली माघार आणि चीनमधील ब्रिटिश कंपन्यांचा निर्णय, ह्यांत फरक आहे. अँग्लो इराणिअन ऑइल कंपनीला खास करारान्वयें इराणमध्यें विशिष्ट हक्क होते. ब्रिटिश कंपन्यांना चीनमध्यें तसे हक्क नाहींत. त्यामुळें, इराणमध्यें ब्रिटिश सरकार इराणच्या सरकारशीं त्या हक्कांचे जोरावर बोलणीं करूं शकत होतें. चीनमध्यें तसा प्रश्नच येत नाहीं. चीन सरकारकडे समजूतदारपणाची विनंति करणें, एवढेंच ब्रिटिश सरकारच्या हातीं आहे. हाँगकाँगमध्यें मात्र करारान्वयें ब्रिटिशांना कांहीं खास हक्क आहेत. ते अद्याप कायम राहिले आहेत आणि हाँगकाँगमधून चीनशीं व्यापार चालू ठेवणें ब्रिटिशांना अद्यापहि शक्य आहे. हाँगकाँगचें ब्रिटिशांच्या हितसंबंधांच्या दृष्टीनें महत्त्व त्यामुळें पुष्कळच वाढलें आहे.

ब्रिटिश कंपन्यांनीं चीन देश सोडून जावयाचा निश्चय केलेला असल्यानें, त्यांच्या तेथील मालमत्तेला चांगली किंमत किंवा भाडें येणें अशक्यच आहे, आणि एकदां त्या चीनमधून निघून गेल्यावर मागें उरलेल्या मालमत्तेच्या भवितव्याबद्दल कांहींच सांगतां येणार नाहीं. अडचणींत आलेल्या ब्रिटिश कंपन्यांत प्रमुख म्हणजे जार्डिन, मॅथीसन अँड कंपनी, बटरफील्ड अँड स्वायर, शेल पेट्रोलियम आणि अँग्लो-अमेरिकन टोबॅको कंपनी, ह्या होत. ब्रिटिशांचे चीनमध्यें प्रचंड हितसंबंध होते, म्हणूनच ब्रिटिश सरकारनें चीनच्या नव्या राजवटीस जानेवारी, १९५० मध्येंच मान्यता देण्याचें ठरविलें. चीनच्या परराष्ट्रीय व्यापारापैकीं निम्मा व्यापार ब्रिटिश कंपन्यांमार्फत चालतो, परंतु ब्रिटन-चीन व्यापार एकूण ब्रिटिश व्यापाराच्या दोन टक्केहि भरत नाहीं.

---

## ओगले ग्लास वर्क्स लि., ओगलेवाडी

सन १९५१ सालांत कारखान्याच्या कांच, मेटल व एनॅमल खात्याकडील मिळून अव्वल नफा व प्राप्तीच्या इतर बाबी यांतून खर्च व घसारा वजा जातां निव्वळ नफा रु. ७५,७४६-१-८ राहातो. चालू सालीं एकूण घसारा रु. १,८७,६०४-७-९ काढण्यांत आला आहे. कारखान्याचें काम अहवालाचे सालीं सुरळीत चालू होतें व एकंदर रु. ३२,१९,८०० किंमतीच्या मालाचें उत्पादन झालें. हें उत्पादन १९५० सालचें उत्पादनापेक्षां रु. ६,६३,६०० नीं अधिक झालें असूनही वाढती मजुरी व कच्च्या मालाचे वाढते भाव यामुळें फायद्याचें प्रमाण अल्प राहिलें.

डायरेक्टर्स यांनीं निव्वळ नफ्याची विभागणी खालीलप्रमाणें करावी अशी शिफारस केली आहे:—

| | |
|---|---|
| (१) कामगार प्रॉव्हिडंड फंड वर्गणीसाठी तरतूद | रु. ४५,००० ० ० |
| (२) मागील सालच्या रु. ५२,१७२-१२-३ नुकसानी पोटीं | रु. ३०,७४६ १ ८ |
| एकूण रुपये | ७५,७४६ १ ८ |

कंपनीस इंडस्ट्रिअल फायनान्स कार्पोरेशन ऑफ इंडिया, न्यू दिल्ली, यांचेकडून कांच, कंदिल व एनॅमल या खात्यांचे वाढीसाठीं रु. २०,००,००० चें कर्ज मंजूर झालें आहे. सदर कर्जाचा उपयोग आधुनिक यंत्रसामुग्री व इतर साधनें विकत घेण्याचे कामीं मुख्यतः केला जाऊन त्यामुळें मालाचें उत्पादन व दर्जा दोन्हीही वाढतील. उत्पादन वाढल्यानें आज दिसून येणारें उत्पादन व त्यासाठी लागणारी मजुरी व इतर खर्च यांच्या प्रमाणांतील विसंगतता कमी होईल अशी अपेक्षा आहे.

---

## ऑलिंपिक सामने भरविण्यासाठीं जपानचा प्रयत्न

१९६० मधील ऑलिंपिक सामने जपानमध्यें टोकियो येथें भरविण्यांत यावे, अशी जपानची खटपट चालू आहे. १९४० मध्यें टोकियो येथें व्हावयाचे सामने युद्धामुळें रद्द करण्यांत आले होते. रोम, मेक्सिको, लॉस एंजेल्स आणि डेट्रॉइट ह्या शहरांची हा उत्सव मिळविण्याची धडपड ह्यापूर्वीच सुरू झालेली आहे. मेलबर्न येथें १९५६ मधील सामने भरविले जातील, तेव्हां १९६० मधील सामन्यांबाबत निर्णय केला जाईल.

## १९५२-५३ चें दुरुस्त अंदाजपत्रक व अर्थमंत्र्यांचें भाषण

१९५२-५३ चें दुरुस्त अंदाजपत्रक अर्थमंत्री श्री. देशमुख यांनी ता. २३ मे रोजीं लोकसभेला सादर केलें. या पत्रकांत नवीन करयोजना नाहीं, कर-विषयक सवलत नाहीं व अन्नधान्याबद्दल मदतहि नाहीं. आज देशाला विकास-योजनांवर विशेष खर्च करावा लागणार असल्यामुळें स्वस्त दरांत सर्व ठिकाणीं धान्य पुरविण्यासाठी लागणारा जादा रु. ९० कोटी खर्च करण्याची ताकद सरकारपाशीं नाहीं, असा स्पष्ट खुलासा अर्थमंत्र्यांनीं केला. फेब्रुवारी अखेर सुरू झालेल्या मंदीबाबत विशेष काळजी करण्यासारखें नाहीं, कारण किंमती थोड्या उतरल्या तरी त्या आतां सुधारत आहेत व उत्पादनाची सुधारलेली परिस्थिति कायम टिकविण्याकडे सरकारची दृष्टि राहील. चलनवाढ टाळणें, चलनसंकोचहि टाळणें व किंमती स्थिर राहातील, असे प्रयत्न करण्याचें धोरण राहील.

फेब्रुवारींत सादर केलेल्या पत्रकांत जमेचा अंदाज रु. ४२४ कोटी ९८ लक्ष होता, परंतु आतां तो रु. ४०४ कोटी ९८ लक्ष धरण्यांत आला आहे. कारण कस्टमच्या करांचें उत्पन्न घटण्याचा संभव आहे. खर्चाचा पूर्वीचा अंदाज रु ४०६ कोटी २५ लक्ष होता तो आतां रु. ४०१ कोटी २५ लक्ष आकारला आहे. काटकसरीच्या धोरणामुळें खर्चांत रु. ५ कोटींची बचत साधणार आहे. मूळचा १९५२-५३ चा भांडवली खर्च रु. ७५ कोटी ८ लक्ष होता तो थोडासा वाढून आतां रु. ७९ कोटी ३३ लक्ष आकारला आहे. या सर्व आंकड्यांचा संकलित परिणाम असा कीं चालू सालीं सरकारी सर्वसाधारणा जमाखर्चांत मूळच्या रु. १८ कोटी ७३ लक्षांऐवजीं रु. ३ कोटी ७३ लक्ष शिल्लक राहाणार आहे, व भांडवली खर्च हिशेबांत घेतां एकूण तूट रु. ७५ कोटी ६० लक्ष राहाणार आहे. फेब्रुवारीच्या अंदाजाप्रमाणें एकूण तूट रु. ५६ कोटी ३५ लक्ष होती.

फाळणीपासून चालू वर्षअखेर म्हणजे मार्च १९५३ पर्यंत सरकारी रोकड शिल्लक रु. २०० कोटींनीं घटून ती फक्त रु. ८३ कोटी उरणार आहे. लष्करी खर्च रु. १९७ कोटी ९५ लक्ष होईल व त्यांत काटकसर अशक्य आहे. परंतु मुलकी खर्चांत रु. ५ कोटींची बचत साधणार आहे. विकास योजनांसाठी खर्च वाढणार आहे. कारण रु. ३ कोटी अमेरिकन सहकार्याप्रमाणें होणाऱ्या ग्रामविकास योजनांसाठी नवीनच खर्च होतील. मजुराकरितां घरें बांधण्यासाठी मदत म्हणून रु. २ कोटींची तरतूद केली आहे. भांडवली अंदाजपत्रकांत पाटबंधाऱ्यांचा लहान योजनांसाठी रु. १० कोटी जास्त खर्चिले जातील, मजुरांच्यासाठी घरांबद्दल कर्ज रु. ५ कोटी दिलें जाईल, ग्रामीण विकास योजनांसाठी रु. ६ कोटी कर्ज दिलें जाईल व यंत्रसामुग्री तयार करण्याच्या कारखान्याला रु. २५ लक्ष भांडवल सरकारतर्फे गुंतविलें जाईल.

परराष्ट्रांच्या व्यापारी देण्याबद्दल गेल्या वर्षापासून परिस्थिति बिघडली. कारण, अवमूल्यनामुळें मिळालेली संधि व कोरियन-युद्ध प्रकरणामुळें उत्पन्न झालेली लाट ओसरली व त्याचा परिणाम गेल्या वर्षी दिसून आला. यामुळें आयात वाढली व निर्गत मात्र कमी झाली. आयातीच्या बाबतींत धान्याला जास्त किंमत द्यावी लागली. याचा परिणाम व्यापाराच्या प्रतिकूल तफावतींत दिसून आला. परंतु ही प्रतिकूल तफावत कांहींशी अपेक्षितच होती. देशाच्या पैशांची उधळपट्टी यामुळें झालेली नाहीं. एप्रिल अखेर पर्यंत चालू व्यापारांतील तूट शिलकी रकमांतून भरून निघाली व स्टर्लिंग शिलकींतील रकमेची उचल करावी लागली नाहीं. डॉलरशिलकीबद्दल परिस्थिति बिकट चालली आहे, परंतु ही गोष्ट सर्व स्टर्लिंग गटांतील देशांनाहि लागू आहे. जागतिक बँकेकडून कांहीं कर्जे मिळणें संभवनीय आहे. त्यांत यश आल्यास डॉलर बद्दलची परिस्थिति सुधारेल. गहूं व कापूस यांच्या सांठ्याची स्थिति सुधारल्यामुळें १९५२ च्या उत्तरार्धांत देशाचा डॉलर खर्चहि कमी होईल.

मार्च १९५३ ला शिल्लक रु. ८३ कोटी राहील असा उल्लेख वर केलाच आहे. या शिलकींत परदेशांतून मदत म्हणून मिळालेले परंतु खर्ची न पडलेले रु. ४० कोटी समाविष्ट आहेत. देशाचा एकंदर अर्थव्यवहार व जबाबदाऱ्या लक्षांत घेतां रु. ८३ कोटी शिल्लक ही किमान आवश्यक इतकीच राहाणार आहे. विकास-योजनासाठीं होणारा खर्च विचारांत घेतला असतां सरकारला कर-विषयक सवलती कोणालाहि देतां येण्यासारख्या नाहींत. कारण सरकारपुढें प्रश्न खर्चांत येणारी तूट कशी भरून काढावी हा आहे. गेलीं दोन वर्षे सरकारी उत्पन्न वाढत होतें, परंतु यापुढें तें कमी होणार आहे. परंतु याचवेळीं खर्चाचें प्रमाण मात्र वाढत आहे. गेल्या तीन महिन्यांत उतरलेल्या किंमतींमुळें सामान्य जनतेला थोडी तरी मदत झाली आहे. तेव्हां धान्याला थोडी जास्त किंमत द्यावी लागते ती जनतेनें सहन करणें जरूर आहे. लष्करी खर्चांत थोडीशी काटकसर कशी साधतां येईल याचा अंदाज पुढील वर्षी देतां येईल. शेवटीं स्पष्ट शब्दांत अर्थमंत्र्यांनीं असें निवेदन केलें कीं, यापुढें संचित शिलकींतून कोणताच खर्च सरकारला करतां येण्यासारखा नाहीं, व सार्वजनिक खर्च आणि विकास-योजना यांसाठीं खर्च याबद्दल तरतूद उत्पन्नाचीं साधनें व कर्ज-उभारणी इ. मार्गांनींच करावी लागेल. बाहेरच्या मदतीवर फारसें अवलंबून राहातां येणार नाहीं.


## Brihan Maharashtra College Of Commerce, Poona—4

The College will open for the new academic year in the new buiding (near the Servants of India Society, Poona-4) on 10th JUNE 1952. Applications for admission should be made immediately after the result of the qualifying Examination with Rs. 12/- as deposit towards fees plus Rs. 10/- for eligibility certificate fee for S. C. C. passed Candidates and Rs. 10/- as deposit if hostel accommodation is required. Prospectus and application form on receipt of Annas SIX.

Balance of Tuition fees for the 1st term Rs. 110/- payable at the time of admission.

T. M. Joshi, Principal.

## Deccan Institute of Commerce

*594, Budhwar Peth. Poona, 2.*

Classes for 1952-53 Session will begin on Friday the 20th June 1952. G. C. D., L. C. C., D. Com., C. A. (1st), G. D. C. & A., C. A. I. I. B, Dip. L. A., Shorthand, Type-writing Courses. Morning and Evening classes. Prospectus free on application to the Secretary.

## कापड–सूत नियंत्रण

( लेखक:—"एक अनुभवी तज्ञ" )

एप्रिल १९५२ पासून तलम व आतितलम कापडाचे व सुताचे, तसेच मे १९५२ पासून मध्यम व जाडया कापडाचे आणि सुताचे भाव कमी झालेले आहेत. तत्पूर्वीच्या शिक्क्यांचा माल गिरण्यांना, सरकारी कोष्टकाप्रमाणें आकारलेल्या व छापलेल्या भावापेक्षां कमी भावानें, खरीदणाऱ्याच्या मर्जीनुरूप आतां विकावा लागत आहे. तेव्हां गेलीं कित्येक वर्षें जारी असलेल्या नियंत्रणाचें सिंहावलोकन करणें अप्रस्तुत होणार नाहीं.

दुसरें जागतिक युद्ध चालू असतांना, लष्करी गरज भागवून, प्रजेस जरूरीचें असलेलें कापड, किमान प्रमाणांत तरी उपलब्ध व्हावें ह्या दृष्टीनें इंग्रज सरकारनें तात्कालिक नियंत्रणें बसविलीं होतीं. तद्नंतर, तसेंच, आपलेंच राज्य झाल्यावर, सुमारें फेब्रुआरी १९४४ चे सुमारास, हीं नियंत्रणें जवळ जवळ रद्द करण्यांत आलीं होतीं. कापडावर भाव छापणें बंद करण्यांत आलें. नियंत्रणें काढल्यावर, त्यांचें दृश्य फळ, इष्ट न मिळतां, कापडाच्या व सुताच्या किंमती भरमसाट वाढल्या. त्यास तोड म्हणून जुलै १९४८ पासून परत नियंत्रणें सुरू झालीं. हीं नियंत्रणें कापड व सूत ह्यांच्या किंमती, वाटप व ने–आण ह्या बाबतींत होतीं. हीं नियंत्रणें असून सुद्धां वापरणारास टिकाऊ व वाजवी किंमतींचा कपडा मिळेना. हातमाग व यांत्रिक माग ह्यांस सूत मिळेना. काळ्या बाजाराला ऊत आला. तेव्हां, जानेवारी १९४९ पासून ज्यास कापड-सूत-निर्मिति- नियंत्रण म्हणतात, तें उपर्युक्त नियंत्रणांच्या जोडीनें सुरू झालें. ह्या नियंत्रणामुळें अमुकच कापड, अमुकच नंबरचें सूत असलेले, अमुकच धागे उभे, आडवे असलेले, अमुकच टक्के अमुकच तऱ्हेचे रंगविलेले अथवा छापलेले, तसेच अमूकच सूत नंबर, अमुकच ताकदीनें तुटणारें असें बनविण्याची मर्यादा, गिरण्यांना घालून देण्यांत आली व ती मर्यादा पाळली जात आहे कीं नाहीं तें पहाण्यास उत्पादनकेंद्रांतून सरकारी खातीं उघडण्यांत आलीं. सोबतच गिरण्यांनीं आकारावयाची व किरकोळ किंमती ठरविण्याचीं नवीन कोष्टकें बसविण्यांत आलीं. सरकारीच कायदा, तेव्हां तो जारी झालाच. तरी पण गिरणीमालकांनीं मूळ हेतूला बगल देऊन, जास्तींत जास्त पैसा मिळवतां येईल ह्या रीतीनें कापडाच्या जाती बनविण्यास प्रारंभ केला व त्या जातींना गिऱ्हाईक नसतांनासुद्धां त्याचें उत्पादन चालू ठेविलें, व तो माल न खपल्याची व त्यामुळें गिरण्यांतून तुंबून रहात असलेल्या मालाची जबाबदारी सरकारवर टोलविली. ( सध्यां सुद्धां कित्येक मातब्बर गिरणीमालक तसेंच म्हणत आहेत. ) कांहीं कांहीं कापडाचे बाबतींत तर, नियंत्रणकायद्यांच्या कलमांचा दुरुपयोग होऊन, गैरवाजवी किंमती सरकारमान्य होऊन कापडावर छापल्या गेल्या. ही परिस्थिति जानेवारी १९४९ ते मार्च १९४९ पर्यंत होती. बाजरांत किरकोळ कापड मिळण्यास कठिण झालें. अमुक अमुक जाती कायमच्याच दिसेनाशा झाल्या.

दर तीन महिन्यांनीं कापडाच्या व सुताच्या भावांची उजळणी होत असते. त्याप्रमाणें, एप्रिल १९४९ पासून भाव वाढणार आहेत अशी १५ मार्च १९४९ नंतर बातमी फुटली व पुष्कळशा गिरण्यांनीं अत्यंत कमी प्रमाणांत कापडाच्या गांठी बांधल्या. त्यानंतर जुलै १९४९ पासून भाव घटण्याचा संभव आहे ( तो नंतर खरा झाला ) असें समजल्यामुळें गिरण्यांनीं फारच मोठ्या प्रमाणावर एप्रिल–जून ह्या तिमाहींत गांठी बांधल्या.

ह्या ठिकाणीं एक महत्त्वाची गोष्ट, ज्याबद्दल कापडधंद्यांत मुरलेल्या लोकांना चांगली माहिती आहे, नमूद केली पाहिजे ती हीं कीं, निर्नियंत्रण कालांत अथवा नियंत्रणकालांत वर्षाचें बारा महिन्यापैकीं दुर्गापूजा ( उत्तर व पूर्व हिंदुस्थान )–दिवाळी ते साधारण होळीपर्यंत गिऱ्हाइकी चांगली असते व बाकीचे

## भारत इं. बँक लि. च्या डायरेक्टरांची महाबळेश्वरला सहल

पुण्यांतील बँकर्सनीं दीड महिन्यापूर्वी खंडाळें-लोणावळें विभागांत सहल काढली होती. त्या सहलीनें अशा इतर सहलींना चांगली चालना दिलेली दिसते. न्यू सिटिझन बँकेचे मॅ. डायरेक्टर श्री देशपांडे ह्यांनीं ह्या उपक्रमाचें कौतुक केलें, तर त्या बँकेचे पुणें शाखेचे एजंट श्री. गांडेकर हे म्हैसूर व उटकमंड भागांत मोटारनें २,००० मैलांचा प्रवास करून आले. भारत इं. बँकेच्या डायरेक्टरांनीं मेच्या पहिल्या आठवड्यांत तीन दिवस महाबळेश्वरच्या थंड हवेंत घालविले. भारत इं. बँकेच्या डायरेक्टरांचें अनुकरण इतर बँकांच्या डायरेक्टरांनीं करण्याजोगें आहे. अकृत्रिम सहवासामुळें एकमेकांचा दृष्टिकोन अधिक चांगल्या रीतीनें समजण्यास साहाय्य होतें आणि ही गोष्ट बँकांच्या हिताचीच आहे. खालील दोन्ही छाया–चित्रें श्री. नि. ना. क्षीरसागर ह्यांनीं काढलेलीं आहेत.



**वेण्णा तलावावर**

उभे ( डावीकडून ):- सौ. क्षीरसागर, बाबुराव केळकर, नारायणराव केळकर, साळवेकर, वाळवेकर, कुलकर्णी, आडकर, महाजन, देशपांडे.

बसलेले ( डावीकडून ):–कु. विजया, दामोदरे, राजाभाऊ केळकर, जोशी.



**आर्थर सीटवर**

उभे ( डावीकडून ):–शिपाई कदम, बाबुराव केळकर, नारायणराव केळकर, राजाभाऊ केळकर, कुलकर्णी, जोशी, दामोदरे, वाळवेकर, देशपांडे, आडकर, महाजन, साळवेकर, सौ. क्षीरसागर, कु. विजया.

## कापड–सूत नियंत्रण

( लेखकः—"एक अनुभवी तज्ञ" )

एप्रिल १९५२ पासून तलम व अतितलम कापडाचे व सुताचे, तसेच मे १९५२ पासून मध्यम व जाडया कापडाचे आणि सुताचे भाव कमी झालेले आहेत. तत्पूर्वींच्या शिल्लकांचा माल गिरण्यांना, सरकारी कोष्टकाप्रमाणें आकारलेल्या व छापलेल्या भावापेक्षां कमी भावानें, खरीदणाऱ्याच्या मर्जीनुरूप आतां विकावा लागत आहे. तेव्हां गेलीं कित्येक वर्षें जारी असलेल्या नियंत्रणाचें सिंहावलोकन करणें अप्रस्तुत होणार नाहीं.

दुसरें जागतिक युद्ध चालू असतांना, लष्करी गरज भागवून, प्रजेस जरूरीचें असलेलें कापड, किमान प्रमाणांत तरी उपलब्ध व्हावें ह्या दृष्टीनें इंग्रज सरकारनें तात्कालिक नियंत्रणें बसविलीं होतीं. तदनंतर, तसेंच, आपलेंच राज्य झाल्यावर, सुमारें फेब्रुआरी १९४४ चे सुमारास, हीं नियंत्रणें जवळ जवळ रद्द करण्यांत आलीं होतीं. कापडावर भाव छापणें बंद करण्यांत आलें. नियंत्रणें काढल्यावर, त्यांचें दृश्य फळ, इष्ट न मिळतां, कापडाच्या व सुताच्या किंमती भरमसाट वाढल्या. त्यास तोड म्हणून जुलै १९४८ पासून परत नियंत्रणें सुरू झालीं. हीं नियंत्रणें कापड व सूत ह्यांच्या किंमती, वाटप व ने–आण ह्या बाबतींत होतीं. हीं नियंत्रणें असून सुद्धां वापरणारास टिकाऊ व वाजवी किंमतींचा कपडा मिळेना. हातमाग व यांत्रिक माग ह्यांस सूत मिळेना. काळ्या बाजाराला ऊत आला. तेव्हां, जानेवारी १९४९ पासून ज्यास कापड-सूत-निर्मिति- नियंत्रण म्हणतात, तें उपर्युक्त नियंत्रणांच्या जोडीनें सुरू झालें. ह्या नियंत्रणामुळें अमुकच कापड, अमुकच नंबरचें सूत असलेले, अमुकच धागे उभे, आडवे असलेले, अमुकच टक्के अमुकच तऱ्हेचे रंगविलेले अथवा छापलेले, तसेच अमुकच सूत नंबर, अमुकच ताकदीनें तुटणारें असें बनविण्याची मर्यादा, गिरण्यांना घालून देण्यांत आली व ती मर्यादा पाळली जात आहे कीं नाहीं तें पहाण्यास उत्पादनकेंद्रांतून सरकारी खातीं उघडण्यांत आलीं. सोबतच गिरण्यांनीं आकारावयाचीं व किरकोळ किंमती ठरविण्याचीं नवीन कोष्टकें बसविण्यांत आलीं. सरकारीच कायदा, तेव्हां तो जारी झालाच. तरी पण गिरणीमालकांनीं मूळ हेतूला बगल देऊन, जास्तींत जास्त पैसा मिळवतां येईल ह्या रीतीनें कापडाच्या जाती बनविण्यास प्रारंभ केला व त्या जातींना गिऱ्हाईक नसतांनासुद्धां त्यांचें उत्पादन चालू ठेविलें, व तो माल न खपल्याची व त्यामुळें गिरण्यांतून तुंबून रहात असलेल्या मालाची जबाबदारी सरकारवर टोलविली. ( सध्यां सुद्धां कित्येक मातब्बर गिरणीमालक तसेंच म्हणत आहेत. ) कांहीं कांहीं कापडाचे बाबतींत तर, नियंत्रणकायद्यांच्या कलमांचा दुरुपयोग होऊन, गैरवाजवी किंमती सरकारमान्य होऊन कापडावर छापल्या गेल्या. ही परिस्थिति जानेवारी १९४९ ते मार्च १९४९ पर्यंत होती. बाजारांत किरकोळ कापड मिळण्यास कठिण झालें. अमुक अमुक जाती कायमच्याच दिसेनाशा झाल्या.

दर तीन महिन्यांनीं कापडाच्या व सुताच्या भावांची उजळणी होत असते. त्याप्रमाणें, एप्रिल १९४९ पासून भाव वाढणार आहेत अशी १५ मार्च १९४९ नंतर बातमी फुटली व पुष्कळशा गिरण्यांनीं अत्यंत कमी प्रमाणांत कापडाच्या गांठी बांधल्या. त्यानंतर जुलै १९४९ पासून भाव घटण्याचा संभव आहे ( तो नंतर खरा झाला ) असें समजल्यामुळें गिरण्यांनीं फारच मोठ्या प्रमाणावर एप्रिल–जून ह्या तिमाहींत गांठी बांधल्या.

ह्या ठिकाणीं एक महत्त्वाची गोष्ट, ज्याबद्दल कापडधंद्यांत मुरलेल्या लोकांना चांगली माहिती आहे, नमूद केली पाहिजे ती ही कीं, निर्नियंत्रण कालांत अथवा नियंत्रणकालांत वर्षाचे बारा महिन्यापैकीं दुर्गापूजा ( उत्तर व पूर्व हिंदुस्थान )–दिवाळी ते साधारण होळीपर्यंत गिऱ्हाइकी चांगली असते व बाकीचे

## भारत इं. बँक लि. च्या डायरेक्टरांची महाबळेश्वरला सहल

पुण्यांतील बँकर्सनीं दीड महिन्यापूर्वी खंडाळें-लोणावळें विभागांत सहल काढली होती. त्या सहलीनें अशा इतर सहलींना चांगली चालना दिलेली दिसते. न्यू सिटिझन बँकेचे मॅ. डायरेक्टर श्री देशपांडे ह्यांनीं ह्या उपक्रमाचें कौतुक केलें, तर त्या बँकेचे पुणें शाखेचे एजंट श्री. गांडेकर हे म्हैसूर व उटकमंड भागांत मोटारनें २,००० मैलांचा प्रवास करून आले. भारत इं. बँकेच्या डायरेक्टरांनीं मेच्या पहिल्या आठवड्यांत तीन दिवस महाबळेश्वरच्या थंड हवेंत घालविले. भारत इं. बँकेच्या डायरेक्टरांचें अनुकरण इतर बँकांच्या डायरेक्टरांनीं करण्याजोगें आहे. अकृत्रिम सहवासामुळें एकमेकांचा दृष्टिकोन अधिक चांगल्या रीतीनें समजण्यास साहाय्य होतें आणि ही गोष्ट बँकांच्या हिताचीच आहे. खालील दोन्ही छाया–चित्रें श्री. नि. ना. क्षीरसागर ह्यांनीं काढलेलीं आहेत.



**वेण्णा तलावावर**

उभे ( डावीकडून ):- सौ. क्षीरसागर, बाबुराव केळकर, नारायणराव केळकर, साळवेकर, वाळवेकर, कुलकर्णी, आडकर, महाजन, देशपांडे.

बसलेले ( डावीकडून ):–कु. विजया, दामोदरे, राजाभाऊ केळकर, जोशी.



**आर्थर सीटवर**

उभे ( डावीकडून ):–शिपाई कदम, बाबुराव केळकर, नारायणराव केळकर, राजाभाऊ केळकर, कुलकर्णी, जोशी, दामोदरे, वाळवेकर, देशपांडे, आडकर, महाजन, साळवेकर, सौ. क्षीरसागर, कु. विजया.

### ब्रिटनमधील औद्योगिक प्रदर्शन

ब्रिटनमध्यें सध्यां एक ब्रिटिश इंडस्ट्रीज फेअर चालू आहे. लंडनमध्यें आणि बर्मिंगहॅममध्यें भरविण्यांत आलेल्या ह्या प्रदर्शनांत १०,००,००० चौरस फूट जागा केवळ दुकानांनीं व्यापली आहे. प्रदर्शनांत मालाची खरेदी करण्यासाठी जवळ जवळ १०० देशांतून गिऱ्हाइकें आलीं आहेत. निरनिराळ्या प्रकारच्या २,५०० कारखान्यांनीं सुमारें १०,००० नव्या वस्तू बघण्यासाठी मांडल्या आहेत. उद्योगधंद्यांच्या वर्गीकरणाच्या दृष्टीनें ह्या कारखान्यांची विभागणी ८० उद्योगधंद्यांत करतां येईल. एंजिनिअरिंगचें साहित्य, खेळणीं, अन्न, प्लॅस्टिक्स, चिनीमातीचीं भांडीं, कांचेचें सामान, कापड, इत्यादि अनेक प्रकारचा माल प्रदर्शनांत ठेवलेला आहे. प्रदर्शनाचा एक विशेष असा कीं, कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांचा म्हणून एक खास विभाग उघडण्यांत आला आहे. ब्रिटनच्या वसाहती जशा जगाच्या निरनिराळ्या भागांत आहेत त्याप्रमाणें त्यांच्याच मांडण्यांत आलेला मालही विविध प्रकारचा आहे. माल्टामधील लेस, सायप्रसमधील रेशीम आणि फळें येथपासून जमेकामधील दारूपर्यंत नानाप्रकारचा माल आला आहे.

प्रदर्शनांत नायलॉनच्या मालाचा एक स्वतंत्र गाळाच आहे. ह्या गाळ्यांत नायलॉनचे कोट, संध्याकाळचा पोषाख व बूट इत्यादी अद्यावत तऱ्हेचा माल मांडण्यांत आला आहे. निरनिराळ्या कारखानदारांनीं आपण करीत असलेल्या प्रयोगात्मक वस्तूंचीहि जाहिरात करण्यास सुरवात केली आहे. एका कारखानदारानें एक यांत्रिक मूल तयार करण्यासंबंधी प्रयोग चालविले आहेत. तत्संबंधींच्या प्रसिद्धीमुळें वैद्यकीय जगांत बरीच खळबळ उडाली आहे. रॉयल एअरक्रॅफ्ट एस्टॅब्लिशमेंटनें विमानाची एक प्लॅस्टिकची विंग तयार केली आहे. गृहिणी-विभागांत घरांत लागणारीं लहानसहान यंत्रें ठेवण्यांत आलीं आहेत. हिमालयाच्या गौरीशिखराचा एक नमुना ठेवण्यांत आला असून धाडसी मुलांना तो फारच आकर्षून घेत आहे.

---

### शेड्यूल्ड-बँकांकडील ठेवी व त्यांनीं दिलेलीं कर्जें

| | मुदती ठेवी | चालू ठेवी | एकूण | रोख व बँकांत | | बिलें व कर्जें | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. ( कोटी ) | | | रु.(कोटी) | ठेवींशीं प्रमाण % | (रु.कोटी) | ठेवींशीं प्रमाण % |
| १९४८ सरासरी | ६७९ | ३११ | ९९० | १२३* | १२.५* | ४३३ | ४३.९ |
| १९४९ ,, | ६११ | २९८ | ८८९ | १०१ | ११.४ | ४५० | ५०.६ |
| १९५० ,, | ५९४ | २७३ | ८६७ | ९६ | ११.१ | ४४१ | ५०.९ |
| १९५१ ,, | ६०४ | २९१ | ८९५ | ९६ | १०.८ | ५३३ | ५९.५ |
| १९५२ एप्रिल | ६१६ | २९४ | ९१० | ८७ | ९.६ | ५६७ | ६२.३ |
| मे | ६०६ | २९५ | ९०१ | ८५ | ९.५ | ५७९ | ६४.३ |
| जून | ५९७ | २९३ | ८९१ | ९४ | १०.६ | ५६६ | ६३.५ |
| जुलै | ६१२ | २८८ | ९०० | १०३ | ११.४ | ५४७ | ६०.८ |
| ऑगस्ट | ६१६ | २८८ | ९०४ | १११ | १२.३ | ५२५ | ५८.१ |
| सप्टेंबर | ६१० | २८७ | ८९७ | ११४ | १२.७ | ५०८ | ५६.७ |
| ऑक्टोबर | ५९८ | २८८ | ८८६ | ११३ | १२.८ | ५०६ | ५७.१ |
| नोव्हेंबर | ५८३ | २९२ | ८७५ | १०० | ११.५ | ५१३ | ५८.५ |
| डिसेंबर | ५८० | २९२ | ८७२ | ८६ | ९.९ | ५४३ | ६२.३ |
| १९५२ जाने. | ५७२ | २९३ | ८६५ | ८२ | ९.५ | ५७६ | ६६.५ |
| फेब्रुवारी | ५७२ | २९२ | ८६४ | ७८ | ९.० | ५९१ | ६८.४ |
| मार्च | ५६६ | २८६ | ८५२ | ८० | ९.४ | ५९७ | ७०.० |

Save to help yourself and the NATION

WITH THE

HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.

*Branches*: Dadar, Mahim, Poona & Belgaum.

### भारताच्या वकिलातींवरील खर्च

भारताच्या परराष्ट्रीय खात्यानें १९५१-५२ सालचा एक अहवाल लोकसभेच्या सदस्यांत प्रसृत केला आहे. त्या अहवालांत भारताच्या परदेशीय वकिलातींविषयीं आणि प्रतिनिधींविषयीं पुढीलप्रमाणें माहिती आढळून येते.

खर्चांत बचत करण्याच्या उद्देशानें १९५१-५२ सालीं फक्त एकाच देशांत नवीन प्रतिनिधी मंडळ धाडण्यांत आलें. ह्या वर्षी परदेशीय प्रतिनिधींवर भारताचे ३५२.२० लाख रुपये खर्च झाले. कांहीं खास कारणासाठी करण्यांत आलेला ३०५ लक्ष रुपयांचा खर्च मात्र वेगळा आहे. वरील खर्चांतील ५०.५५ लाख रुपये इतकी रक्कम भारताच्या लंडनमधील हाय कमिशनरच्या कचेरीवर खर्च झाली आहे. परराष्ट्र-खात्याच्या दिल्लींतील नोकरांचे पगार व भत्ते ह्यांच्यावर ६२ लाख रुपये खर्च करण्यांत आले. हा खर्च सोडून दिला तर परदेशीय वकिलाती आणि प्रतिनिधी मंडळें ह्याच्यासंबंधीं झालेल्या खर्चाचा आंकडा सुमारें २३९.४५ लाख रुपये इतका होतो. भारताचे निरनिराळ्या ३१ देशांशीं राजनैतिक संबंध आहेत. उलटपक्षीं, भारतांत ४० देशांनीं आपापले राजकीय प्रतिनिधी ठेवलेले आहेत. भारतानें परदेशांत १७ ठिकाणीं वकिलाती, ८ ठिकाणीं लेगेशन्स व ६ ठिकाणीं हाय कमिशनरच्या कचेऱ्या उघडलेल्या आहेत. दर प्रतिनिधी मंडळामागें भारताला सरासरी ४.३५ लाख रुपये खर्च येतो. त्यापैकीं एक लाख रुपये पगारापायीं खर्च होतात. एकूण ५५ प्रतिनिधी मंडळासाठीं जागा व तदनुषंगिक इतर खर्च मिळून ३२ लाख रुपये खर्च होतात. संयुक्त-राष्ट्र-संघटनेला वेळोवेळीं पाठविलेले प्रतिनिधी आणि संघटनेची वर्गणी ह्या बाबींवर ७४ लाख रुपये खर्च होतात. सध्यां भारताच्या परराष्ट्रीय नोकरींत १७२ अधिकारी आहेत, ह्याशिवाय 'ब' वर्ग म्हणून दुसरी एक परराष्ट्रीय नोकरांची श्रेणी निर्माण करण्याचे प्रयत्न चालू आहेत. अहवालाच्या वर्षी ओटावा, कराची, टोकिओ, रंगून आणि कॅनबेरा इतक्या ठिकाणीं परदेशीय प्रतिनिधी-मंडळाच्या सोयीसाठी मालमत्ता विकत घेण्यांत आली. सिंगापूर आणि नैरोबी येथें सध्यां इमारती बांधण्याचें काम चालू आहे. कराची आणि कॅनबेरा येथील इमारतींचें बांधकाम १९५२-५३ सालीं सुरू होईल.

---

**तांदुळाच्या उत्पादनाचीं शिक्षणकेंद्रें**— तांदुळाचें उत्पादन कसें वाढवावें तें शिकविण्यासाठीं भारतांत दोन शिक्षण-केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. अजून ह्या केंद्रांची जागा निश्चित करण्यांत आलेली नाहीं. हें कार्य आंतरराष्ट्रीय तांदूळ कमिशनच्या मार्गदर्शकत्वाखालीं करण्यांत येईल.

## साबणाचें उत्पादन व खप आणि नारळांच्या बाबतींत स्वयंपूर्णता

हिंदच्या साबणाच्या धंद्याला सध्या उत्पादन वाजवीपेक्षां जास्त होत आहे अशी भीति वाटत आहे. परदेशांतून साबणाची आयात अगदीं नामपात्र होते, परंतु देशांतील साबणाच्या कारखान्यांना त्यांच्या उत्पादनक्षमतेप्रमाणें साबण तयार करतां येत नाहीं. कारण, १९५१ मध्यें साबणाच्या कारखान्यांची एकंदर उत्पादनक्षमता २ लक्ष, ६९ हजार टन होती, परंतु प्रत्यक्ष उत्पादन मात्र ७९ हजार टन इतकें कमी झालें. पंचवार्षिक योजनेच्या अहवालाप्रमाणें १९५५–५६ सालीं साबणाचें उत्पादन २ लक्ष, ७० हजार टन झालें पाहिजे. परंतु एवढें उत्पादन वाढावयाचें तर अंतर्गत खप आजच्या तीन पट झाला पाहिजे. तसा खप न वाढल्यास परदेशांत हिंदी साबण खपला पाहिजे. १९४९ ते १९५१ या काळांत साबणाच्या उत्पादनांत फक्त ८ हजार टनांची वाढ दिसून आली. खोबरेल तेलाच्या किंमती गेल्या दोन महिन्यांत उतरल्यामुळें साबण–कारखानदारांना मदत मिळाल्याप्रमाणें झालें आहे. परंतु खोबरेल तेलाच्या किंमती कायमच्या उतरण्याच्या दृष्टीनें नारळांच्या उत्पादनांत वाढ झाली पाहिजे. गेल्या वर्षी नारळांचें उत्पादन थोडेसें घटलेंच. साबणाच्या धंद्याच्या कायम सुस्थितीच्या दृष्टीनें नारळाच्या उत्पादनाच्या बाबतींत स्वयंपूर्ण बनलें पाहिजे. सेंट्रल कोकोनट कमिटीनें नारळांचें उत्पादन वाढविण्यासाठीं व त्याबाबतींत स्वयंपूर्ण बनण्यासाठीं योजना आंखली आहे. परंतु तिच्या अंमलबजावणीला कांहीं वर्षे लागणार, हें उघड आहे.

---

## सरहद्दीवरील टोळीवाल्यांच्या प्रांतासाठीं विकास–योजना

नियोजन–मंडळानें वायव्य सरहद्दीवरील टोळीवाल्यांच्या प्रदेशासाठीं तीन कोटी रुपयांची १९५१–५६ या काळासाठीं एक विकास–योजना तयार केली आहे. या योजनेप्रमाणें शेती, जंगलें, रस्ते, शिक्षण, वैद्यकीय मदत, गुरांची जोपासना, सार्वजनिक आरोग्य, इ. गोष्टींवर खर्च होणार आहे. ४० हजार चौरस मैलांच्या टापूंत राहणाऱ्या ८ लक्ष टोळीवाल्यांना या योजनेचा फायदा मिळेल. टोळीवाल्यांचा हा विभाग फारच मागासलेला असल्यामुळें रस्ते व दळणवळणाचीं साधनें व मार्ग यांवर जास्त प्रमाणांत खर्च केला जाईल. अन्नाचे बाबतींत हा भाग स्वयंपूर्ण नाहीं. येथील लोकांना झाडें, झुडपें व प्राणी यांवर निर्वाह करावा लागतो. एकंदर क्षेत्रापैकीं ६० हजार लोकवस्ती असलेलें २ हजार चौ. मैल क्षेत्र धान्याच्या बाबतींत आजच स्वयंपूर्ण आहे. एक लक्ष वस्तीच्या ३,७०० चौरस मैलांच्या क्षेत्रांत धान्य साधारणच पिकतें व ३४ हजार चौरस मैलांच्या ५ लक्ष, ३८ हजार लोकवस्तीच्या क्षेत्रांत धान्याचें उत्पादन अगदींच कमी आहे. भात हें लोकांचें मुख्य अन्न आहे. बाजरी व मका यांचेंहि पीक कांहीं ठिकाणीं होतें. गहूं अगदीं थोड्या ठिकाणीं पिकविला जातो. योग्य मार्गांनीं प्रयत्न केले असतांना शेतीचें उत्पादन वाढूं शकेल व लोकांची वृत्तीहि अशा प्रकारच्या विकासाला अनुरूप आहे. शेती व गुरें पाळणें यांचें उत्पन्न हल्लीं हे व्यवसाय कसेतरी चालविल्यामुळें बरेंच कमी प्रमाणांत येतें. तेव्हां विकासाला वाव आहे.


**महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें**

या विद्यालयाचे वर्ग ता. १ जुलै १९५२ पासून नं. ५ बैरामजी जिजिभाई रोड, पुणें १, येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असिस्टंट को–ऑपरेटिव्ह ऑफिसर, खरेदी–विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून 'को–ऑपरेटिव्ह डिप्लोमा' मिळविणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठीं विशेष पसंति देण्यांत येते. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खातें येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं दि. १५ जून १९५२ चे आंत अर्ज करावेत.

कृ. वा. देवधर,
सुपरिंटेंडेंट,
महाराष्ट्र सहकारी विद्यालय
५ बैरामजी जिजिभाई रोड, पुणें १.

पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी

**दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.**

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चांत मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधी पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर



**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वर्गणीचे दर :

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : २ आ.

जाहिरातीचे दर :

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ताः–

"अर्थ"

"दुर्गाधिवास" पुणें ४.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे. बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास'. ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.